जयवंत प्रतिष्ठान हुमगांव संचलित

# आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

ता.जावली, जि.सातारा

# जयवंत

## वार्षिक नियतकालिक २०१७-२०१८




*** प्रमुख संपादक ***

**प्रा.डॉ. संजय भोसले**

# आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा.

ता.जावली, जि.सातारा

# जयवंत

## वार्षिक नियतकालिक २०१७-२०१८

### * संपादक मंडळ *

*** अध्यक्ष ***

प्राचार्य

डॉ. एम. बी. वाघमोडे

*** प्रमुख संपादक ***

प्रा.डॉ. संजय हणमंत भोसले

*** सहसंपादक ***

प्रा. साठे ए. एस.

प्रा.डॉ. पवार व्ही. व्ही.

प्रा. ननावरे आर. डी.

प्रा.डॉ. शिंदे एस. आर

*** कार्यालयीन सदस्य ***

श्री. विनोद जाधव

*** मुखपृष्ठ ***

प्रा. शंकर गेजगे



# प्राचार्यांचे मनोगत

महाविद्यालयाचा जयवंत अंक यावर्षी सादर करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

छ.शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या जावली तालुक्यातील मेढा या ठिकाणी आमदार शशिकांत शिंदे साहेबांनी दुर्गम डोंगरी भागातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना उच्च शिक्षण घेता यावे याकरीता सन २००२ साली महाविद्यालयाची स्थापना केली. त्यावेळी १६० विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. सुरुवातीस हे महाविद्यालय कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु होते. हे महाविद्यालय तालुक्यातील एकमेव महाविद्यालय असल्याने मा.आमदार शशिकांत शिंदे साहेब यांच्या प्रयत्नातून २००९ साली ते १००% अनुदानित झाले. महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांमधून पदवी पर्यंतचे शिक्षण दिले जाते. शिवाय पदव्युत्तर शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठातील दूरशिक्षण विभागाचे केंद्र सुरु केले आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या विकासात भर पडली आहे. महाविद्यालयाच्या गुणवत्तेत सतत वाढ होत असल्याने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात १६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उच्चविद्याविभूषित एकूण ५१ प्राध्यापक ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. तर १७ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत.

सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. त्याकरिता प्रा.डॉ.प्रमोद घाटगे व सहकारी प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाने विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून तो सशक्त, समर्थ, बुध्दीमान, स्वाभीमानी, शक्ती संपन्न आणि विधायक वृत्तीचे नागरीक असावेत त्यादृष्टीने शिक्षण देण्याचा प्रयत्न महाविद्यालय करीत आहे. महाविद्यालयामध्ये दहा प्राध्यापक पीएच.डी. व आठ प्राध्यापकांनी एम.फिल. पदवी मिळविली आहे. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रा.प्रकाश जवळ नेट परिक्षा उत्तीर्ण झाले. प्रा.डॉ.संजय भोसले यांना पीएच.डी. पदवी मिळाली. प्राचार्य डॉ.एम.बी. वाघमोडे यांची शिवाजी विद्यापीठाच्या स्थायी समितीवर निवड झाली. प्रा.प्रमोद चव्हाण यांची शिवाजी विद्यापीठ शारिरिक शिक्षण संघटना कार्यकरिणी सदस्य म्हणून निवड झाली. प्रा.संजय धोंडे यांची शिवाजी युनिव्हरसिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन कोल्हापूर या परिषदेच्या कार्यकारणीमध्ये सदस्य म्हणून निवड झाली. प्रा.अमेय देसाई यांची शिवाजी युनिव्हंसिटी कॉमर्स अ‍ॅन्ड मॅनेजमेंटच्या परिषदेत सदस्य म्हणून व प्रा.डॉ.ज्ञानदेव काळे यांची सातारा जिल्हा प्राध्यापक संघटना सहकार्यवाह म्हणून निवड झाली.

विशेष आनंदाची बाब म्हणजे या वर्षी राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यापन परिषद बेंगलोर(नॅक समिती) यांनी महाविद्यालयाचे मूल्यांकन करून $B^{+}$(CGPA-2.55) ग्रेड दिली आहे. याकरिता महाविद्यालयातील सर्व स्टाफ व संस्थेचे प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची बाब आहे. मौजे हुमगांव या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये १३० विद्यार्थी-विद्यार्थीनींचा सहभाग होता. या शिबीरात स्वच्छता, आरोग्य, श्रमाचे महत्व, स्त्री-पुरुष समानता, विधी साक्षरता असे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच ओढ्यातील पाणी अडविणेकरिता ५०० पोत्यांचा

बांध घालण्यात आला. त्यामुळे पाणीपुरवठा विहिरीच्या पाणी साठ्यात वाढ झाली. पाणी व्यवस्थापन संदर्भात अनेक कार्यक्रम राबविण्यात आले.

अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत महाविद्यालयामध्ये उद्‌बोधन, उद्योजकीय मार्गदर्शन, कार्यक्रम राबविण्यात आले. सांस्कृतिक विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान देण्याकरिता MSCIT ,Tally, टायपिंग, फॅशन डिझायनिंग इ. कोर्सेस सुरु आहेत. महाविद्यालयात अद्यावत संगणक विभाग असल्याने तालुक्यातील शासकीय टायपिंग MSCIT या संगणक परिक्षांचे केंद्र म्हणून महाविद्यालयास मान्यता मिळाली आहे.

इंग्रजी विभागामार्फत प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी इंग्रजी कसे शिकवावे व शिक्षण देण्यासाठी साधने कशी वापरावीत यासाठी तालुक्यातील प्राथमिक शिक्षकाकरीता दोन दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. शिवाय शिवाजी विद्यापीठ प्रौढ निरंतर विभागाअंतर्गत बेसिक इंग्रजी ग्रामर कोर्स सुरु केला आहे. त्यास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील सर्वच वर्गांनी गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. प्रत्येक वर्गाचे निकाल ९५ ते ९८ % आहेत. महाविद्यालयातील ग्रंथालय हे ओपॅक ऑनलाईन संगणक युक्त असे आहे. ग्रंथालयात १५000 ग्रंथ, ११ दैनिके, ३४ नियतकालिके आहेत. विज्ञान शाखेतील चार विद्यार्थीनींनी किसनवीर महाविद्यालय वाई येथे झालेल्या वनस्पतीशास्त्राच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये आपले शोध निबंध सादर करुन उल्लेखनिय काम केले आहे. तसेच कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा येथे झालेल्या कॅम्पस इंटरव्हयूमध्ये आपल्या महाविद्यालायातील २० ते २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील बी.एस्सी भाग ३ मधील कु. निलम संजय पवार व दामिनी काशिनाथ धनावडे या विद्यार्थीनीची इन्फोसिस कंपनी (BPO) मध्ये निवड झाली. त्यांचे मनस्वी अभिनंदन !

शिक्षणाबरोबर क्रिडा विभागामध्येही भक्कम अशी कामगिरी झाली. यावर्षी महाविद्यालयात महिला व पुरुषांकरिता जिल्हापातळीवरील टेबल टेनिस स्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी संघाने विशेष प्राविण्य मिळवले. तसेच दहा खेळाडूंनी झोनल-इंटरझोनल स्पर्धेत यश संपादन केले आहे. कु.तारामती सातघरे या विद्यार्थीनीची भोपाळ येथे झालेल्या वेस्ट झोन इंटरयुनिव्हरसिटी टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेत तिने उत्कृष्ठ कामगिरी केली. तिचे मनस्वी अभिनंदन !

महाविद्यालयातील ज्युनिअर विभागाचे कामकाज व्यवस्थितरित्या सुरु आहे. १२ वी च्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखांचा निकाल ९५% आहे. शिवाय जिल्हा व राज्य पातळीवर कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक्स स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ठ कामगिरी केली. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कामकाज व्यवस्थितरित्या सुरु आहे. यावर्षी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची राज्यस्तरीय कार्यशाळा महाविद्यालयात आयोजित केली होती. या कार्यशाळेस उत्तम प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेमध्ये व्यवस्थापन फाईलींग, पत्रव्यवहार, स्वच्छता यासारखे उपक्रम राबविण्यात आले.

महाविद्यालयाच्या विकासाची परंपरा कायम राखत असताना, तसेच विकासाचा आलेख उंचावण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. आ.शशिकांत शिंदे साहेब, सचिव सौ.वैशाली शिंदे, विश्वस्त श्री.अशोकराव नवले, श्री.राहूल जगताप, श्री.दादासाहेब शिंदे(आबा) यांचे मार्गदर्शन लाभते. तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी , समाजातील मान्यवरांचे सहकार्य लाभले.

**प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमोडे**

# आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा.
ता.जावली, जि.सातारा



## संपादकीय मनोगत...

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाचा रुपाने महाविद्यालयाचा **'जयवंत २०१८'** हा नववा अंक आपणासमोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. जावली तालुका हा दुर्गम, डोंगराळ असा आहे. येथील विद्यार्थ्यांना अनेक संकटांचा सामना करुन शिक्षण घ्यावे लागते. या विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी तसेच महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा साहित्याच्या माध्यमातून आपणासमोर आणण्याचा हा एक छोटा प्रयत्न आहे.

आमदार शशिकांत शिंदे साहेब यांनी मेढा या ग्रामीण भागात सुरु केलेले महाविद्यालय ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे ठरलेले आहे. महाविद्यालयात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी अधिकारी पदापर्यंत जावून पोहोचले आहेत. जयवंत प्रतिष्ठान या संस्थेच्या धोरणानुसार महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे. जयवंत या नियतकालिकेमध्ये विद्यार्थ्यांनी परिश्रम पुर्वक लिहिलेले निबंध, लेख, कविता, कथा, विचार, नक्षीकाम, चित्रे यांचे संपादन केले आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमधून विद्यार्थ्यांनी आपले लेखन केले आहे. याशिवाय सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा विविध छायाचित्रे, विविध विभाग व समित्यांचे अहवाल यातून घेतला गेला आहे.

जयवंत २०१८ हे नियतकालिक तयार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी.वाघमोडे सर यांचे कल्पक नियोजन व कार्यक्षम प्रशासन, उपप्राचार्य डॉ.प्रमोद घाटगे यांच्या खंबीर नेतृत्वाचा मोलाचा वाटा आहे. तसेच संपादक मंडळातील सदस्य प्रा.आनंद साठे, प्रा.डॉ.पवार व्ही. व्ही., प्रा.राजेंद्र ननावरे, प्रा.डॉ.सारंगपाणी शिंदे, श्री. विनोद जाधव यांचे बहुमोल सहकार्य मिळाले. या नियतकालिकेसाठी प्रा.शंकर गेजगे यांच्या कल्पकतेतून ' **स्त्री अत्याचारास प्रतिबंध** ' असे सुचित करणारे मुखपृष्ठ साकारण्यात आले आहे.

याशिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचे बहुमोल सहकार्य लाभले. तसेच जयवंत २०१८ चे रेखांकन व छपाईचे काम करणारे श्री स्वामी समर्थ प्रिंटींग प्रेस चे प्रो.प्रा. श्री.संजय जुनघरे यांचेही मी आभार मानतो कारण या अंकाची उत्तम सजावट यामध्ये त्यांचे योगदान मोलाचे आहे. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

धन्यवाद !

**संपादक**
**प्रा.डॉ. संजय भोसले**